महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका .
जा.क्र. मआ/माव्य/ ३८२६
दिनांक -१८/०९/२४

## -: शुद्धिपत्रक :-

विषय :- भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीचे बैठकीचे जा.क्र. माव्य/३४९३ दिनांक :- ०३/०९/२०२४ रोजीचे इतिवृत्ताबाबत.

संदर्भ :- महापालिका आयुक्त कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र. मआ/माव्य/३४९३ दि. ०३/०९/२०२४ चे इतिवृत्त.

भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीचे दि.०२/०७/२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त संदर्भ क्र. १ अन्वये प्रसिद्ध करण्यात आले आहे. तथापि, विषय क्र. ५० ते ५३ मध्ये टंकलेखन चुकीमुळे एकसारखेच मुल्यांकन नमूद झाले असल्याने त्यात खालील प्रमाणे वस्तुनिष्ठ दुरुस्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | शुद्धीपत्रकान्वये करण्यात आलेली दुरुस्ती |
|---|---|---|
| ५०. | पुणे पेठ बाणेर विधाते वस्ती, मयूर मार्केट लेन औंध सि. स. नं. २४४/१ येथील मिळकत कॉम्प्युटर प्रोग्रॅमिंग, फॅशन डिझायनिंग व ब्युटीशन महिला व बचत गटांसाठी विविध वस्तू बनविणेसाठी भाड्याने देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत.<br>(क्षेत्र - ४७४.०० चौ.मी.) | बैठकीमध्ये याबाबत चर्चा होवून मा. अध्यक्ष. भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांनी नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेले चालू वर्षीचे शिघ्र सिद्धगणकानुसार येणारे र. रु. ३,६५,३५,९२०/- मुल्यांकनास मान्यता देण्यात आली असून समाज विकास विभागाने मा. महापालिका आयुक्त यांजकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ५१. | पुणे पेठ वानवडी स.नं. २ हि.नं. ३+४ महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन येथील सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशीय हॉल या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील दोन खोल्या विविध व्यावसायिक प्रशिक्षण कायदा विषयक सल्ला, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी वस्तूचे वाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीर इ. उपक्रमासाठी भाडेतत्वावर | बैठकीमध्ये याबाबत चर्चा होवून मा. अध्यक्ष, भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांनी नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेले चालू वर्षीचे शिघ्र सिद्धगणकानुसार येणारे र. रु. १,८८,०१,१८२/- मुल्यांकनास मान्यता देण्यात आली असून समाज विकास विभागाने मा. महापालिका आयुक्त यांजकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. |

| | | |
|---|---|---|
| | देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत. (क्षेत्र - २३४.७८) | |
| ५२. | प्रभाग क्र. १ क, कळस धानोरी मध्ये स.नं. १९/४ कमल पार्क येथील इमारत संस्थेच्या सहाय्याने १ तणाव मुक्तीसाठी मेडीटेशन, ३ महिला सशक्तीकरण, ४ बालसंस्कार व बाल विकास, ५ सकारात्मक विचार, ६ स्वप्नबंधन, ७ स्टेस मनेजमेंट इ. सामाजिक उपक्रम राबविणेसाठी भाडेतत्वावर देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत. (क्षेत्र - ४०३.६७ चौ.मी.) | बैठकीमध्ये याबाबत चर्चा होवून मा. अध्यक्ष, भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांनी नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेले चालू वर्षीचे शिघ्र सिद्धगणकानुसार येणारे र. रु. ३,९१,०७,५५०/- मुल्यांकनास मान्यता देण्यात आली असून समाज विकास विभागाने मा. महापालिका आयुक्त यांजकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. |
| ५३. | प्रभाग क्र. ६७ ब पर्वती स.नं. ६३ पुणे सातारा रोड येथील मिळकत महिलांसाठी योगासन वर्ग, व्यायाम शाळा, उद्योजक्ता शिबीर, विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग राबविणेसाठी भाडे तत्वावर देणेकामी भाडे रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम निश्चित करून मिळणेबाबत.<br>(क्षेत्र – १३९.४० चौ.मी. ) | बैठकीमध्ये याबाबत चर्चा होवून मा. अध्यक्ष, भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती यांनी नोंदणी व मुद्रांक विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेले चालू वर्षीचे शिघ्र सिद्धगणकानुसार येणारे र. रु. २,३७,०२,१८२/- मुल्यांकनास मान्यता देण्यात आली असून समाज विकास विभागाने मा. महापालिका आयुक्त यांजकडे स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. |

(श्री. अभिजित केतकर)
मा. सहाय्यक संचालक तथा सदस्य
भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती,
नगररचना, नगर विकास विभाग, पुणे

(श्री. संतोष हिंगाणे)
मा. जिल्हा उप / सह निबंधक (मुद्रांक) तथा सदस्य
भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती,
नोंदणी व मुद्रांक विभाग,
महसूल व वन विभाग, पुणे

(महेश पाटील)
उप आयुक्त तथा सदस्य-सचिव
भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती
मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय
पुणे महानगरपालिका

(डॉ राजेन्द्र ब भोसले)
महापालिका आयुक्त तथा अध्यक्ष
भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती
पुणे महानगरपालिका

प्रत: १. मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समिती
२. उप आयुक्त, मालमत्ता व व्यवस्थापन कार्यालय, पुणे महानगरपालिका
३. सर्व खातेप्रमुख / विभाग प्रमुख, पुणे महानगरपालिका